जबाब

दि. १९/०१/२०२६

श्री. कमलाकर रत्नाकर शेनॉय, ६८ वर्षे, धंदा- हॉटेल व्यावसायिक, रा.ठि. बी-९०३, वैशाली अपार्टमेंट, शेत मोतीशाह लेन, टेलिफोन एक्सेंज समोर, माझगांव, मुंबई ४०० ०१०, मोनं. ९८७०९८७३५९/९९२०७७५७९८.

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद ठिकाणी पत्नी व मुलासह सन २०१८ पासून रहावयास आहे. आमचा वडीलोपार्जित हॉटेल व्यवसाय असून माझ्याकडे सॅन्डहर्स्ट रोड स्टेशनसमोरील हॉटेल सद्‌गुरू हे असून माझा धाकटा भाऊ उदय याच्याकडे जेलरोड, उमरखाडी येथील हॉटेल सद्‌गुरू हे आहे. माझे हॉटेल व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नावरच कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो. माझे शिक्षण बिकॉम पर्यंत झालेले आहे.

आज दि. १९/०१/२०२६ रोजी मी डोंगरी पोलीस ठाणेस स्वखूशीने हजर झालो व विचारलेवरून सांगतो की, मी डोंगरी पोलीस ठाणेस दि. ०७/०१/२०२६ रोजी, दि. १४/०१/२०२६ व दि. १९/०१/२०२६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर यांच्याविरुध्द तक्रार अर्ज केलेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका हे सध्या मुंबईमध्ये ठिकठिकाणी चांगले रस्ते तोडून सिमेंट/कॉंक्रिट रस्त्यांचे बांधकाम करीत आहेत. सदरचे कामकाज करीत असताना लोकहिताचा, जनतेच्या सुरक्षिततेचा, स्वास्थ्याचा तसेच ॲम्बुलन्स व फायरब्रिगेड यांना रस्त्याने येण्या-जाण्याकरीता कोणतीही व्यवस्था न करतां कामकाज करीत आहेत. त्यामूळे आजारी व्यक्तींना ॲम्बुलन्सला विहीत वेळेत हॉस्पीटलला घेवून जाण्यास विलंब होत असून इसम दगावत आहेत. तसेच फायरब्रिगेडच्या वाहनांनादेखील ये-जा करण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने हाणी होत आहे.

ए, बी आणि ई वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका परिसरात वाहतुकीची कोंडी होण्याचे मुख्य कारण गेल्या १० वर्षापासून खंडीत असलेला हॅंगकॉक ब्रिज व भायखळा फळबाजार येथील नवीन ब्रिजचे कामकाज चालू आहे. सदर परिसरामध्ये होत असलेल्या रस्त्यांच्या कामामुळे वाहतुक कोंडी होवून ठिकठिकाणी वायु प्रदुषण होत आहे. त्यामुळे परिसरातील स्थानिक रहिवाश्यांना त्या प्रदुषणाला सामोरे जावे लागत आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका हे सुस्थितीत असलेले डांबरी रस्त्याचे उत्खनन करून शासकिय मालमत्तेचे नुकसान करीत आहेत.

सध्या बृहन्मुंबई महानगरपालिका बी वार्ड मध्ये १) लक्ष्मण जाधव मार्ग, २) सामंतभाई नानजी मार्ग, ३) नौरोजी हिल रोड नं ७ तसेच ४) पायधुनी व ५) खडक या ठिकाणी रस्ते तोडून सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्याचे कामकाज चालू आहे. कोणत्याही प्रकारचे काम करण्यासाठी संबंधीत विभागांच्या परवानगी आवश्यकता आहे, कारण तिथे जीवनमरणाचा प्रश्न निर्माण होवू शकतो. परंतू तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कामकाज सुरू करतानां फायरब्रिगेड, वाहतुक पोलीस तसेच स्थानिक पोलीस ठाणेची परवानगी घेतलेली नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी काम चालू करण्या अगोदर ठिकठिकाणी बोर्ड लावणे, स्थानिक रहिवाश्यांचे मत घेणे आवश्यक आहे, तसेच रहिवाश्यांच्या नियमीत गरजांची व होत असलेल्या त्रासांची माहिती घेणे व त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. परंतू बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशाप्रकारे कामकाज करतानां कोणतीही योग्य ती खबरदारी न घेता जाणुनबुजून कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा केलेला आहे.

तसेच सदरबाबत मी व्यक्तीश: बृहन्मुंबई महानगरपालिका रोड डिपार्टमेंट, सेंट्रल एजन्सी, कमर बिल्डींग, नवजीवन सोसायटी समोर, बॉम्बेसेंट्रल, मुंबई येथे जावून चौकशी केली असतां प्रविण गायकवाड (सब इंजिनियर) यांनी मला वरिष्ठ पोलीस निरीक्षक डोंगरी पोलीस ठाणे श्री

KRSh

बांगर यांचे समक्ष वाहतुक विभागाची परवानगी दाखविली व त्या परवानगीमध्ये ज्या अटी आहेत त्याची पुर्तता केलेली दिसत नाही. मुख्यता जे रस्ते तोडले जातात त्याच्या आजुबाजुच्या रस्त्यांच्या तसेच त्याला जोडणाऱ्या आजूबाजूच्या रस्त्यांवर येणाऱ्या अडीअडचणी म्हणजेच ज्या गोष्टींमुळे वाहतुकीची कोंडी होणार आहे उदा. फेरीवाले, सुशोभिकरणाच्या नावाखाली करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे (उदा. पानपोई, वाचनालय, फ्लॉवरबेड व ट्राफीक आयलेंडमधील बेकायदेशीर बांधकाम) ज्यामुळे जनतेला त्रास होणार आहे त्या गोष्टी रस्त्याचे काम सुरु करण्यापूर्वी निष्काशित केल्या पाहिजेत तसेच सदरची बांधकामे परत होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. परंतू बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी १) सामंतभाई नानजी मार्ग, २) लक्ष्मण जाधव मार्ग, ३) नौरोजी हिल रोड नं ५, ४) पायधुनी रोड, ५) खडक रोड, ६) इब्राहिम रहिमतुल्ला रोड, ७) एस व्ही पी रोड, ८) दिमटीमकर रोड, ९) मोहम्मद अली रोड, १०) काळबादेवी रोड व ११) जे जे जंक्शन आणि आजुबाजूचे रस्ते येथील फुटपाथ व ट्राफिक आयलंड या ठिकाणचे कोणतेही अनधिकृत बांधकामे (उदा. पानपोई, वाचनालय, फ्लॉवरबेड व ट्राफीक आयलेंडमधील बेकायदेशीर बांधकाम) निष्काशित केलेली नाहीत व अशाप्रकारे त्याने बिएमसी सर्क्युलर १४/१२/१९९९ चे तसेच वाहतुक पोलीस विभागाच्या अटींचे जाणूनबुजून उल्लंघन केलेले आहे.

तसेच रस्त्याचे कामकाज करतानां वायुप्रदुषण होवू नये ही वाहतुक पोलीस विभागाची अट असते. परंतू उपरोक्त परिसरात होणत्याही प्रकारे वायुप्रदूषण होवू याबाबत खबरदारी घेतलेली नसून वाहतुक पोलीस विभागाच्या अटींचे जाणूनबुजून उल्लंघन केलेले आहे. सदरबाबत मी विचारणां केली असतां मला वायुप्रदुषण होवू नये याकरीता आम्ही काम चालू असलेल्या ठिकाणी पाणी मारण्याचे काम करीत आहे. परंतू वास्तविक पाहतां सदरचे त्यांचे म्हणणे खोटे आहे. वायुप्रदुषण होवू नये याकरीता पाणी मारणे हा पर्याय नसून बृहन्मुंबई महानगरपालिका हे वायुप्रदूषण रोखण्यासाठी पाण्याचा उपयोग करून पाण्याचेदेखील नुकसान करीत आहे. सदरचे बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे म्हणणे दिशाभूल करणारे व लोकांची फसवणूक करणारे आहे.

तसेच बाकीच्या अटींचे पालन केले नसलेबाबत मी निदर्शनास आणल्यानंतर श्री प्रविण गायकवाड हे उत्तर देण्यास असमर्थ असल्याने श्री बांगर साहेब यांना सांगून तेथून निघून गेले.

बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अखत्यारीतील हॅगकॉक ब्रिजचे काम हे १० वर्षापासून प्रलंबित असून काम पूर्ण करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न ठोसपणे केलेले नसल्याचे दिसून येते. उलट सुस्थितीत असलेले रस्ते खोदून त्या बदल्यात नविन सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्यांचे बांधकाम करणे लोकहिताच्या विरुध्द आहे.

माझे म्हणणे असे आहे की, सदरचे रस्त्यांची कामे ही बेकायदेशिररित्या, तसेच वाहतुक पोलीसांनी दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करून तसेच फायरब्रिगेड आणि ॲम्बुलन्स या तत्काल सेवा पुरविणाऱ्या (Time Factor) गोष्टींचा विचार न करतां केलेली अनधिकृत व अधिकृत कर्तव्यात असणारी कामे ही स्थानिक आमदार, खासदार व नगरसेवक, डीएमसी व ॲडीशनल म्युनिसीपल कमिशनर यांच्या संमतीने केली आहेत किंवा नाहीत? तसेच केली असल्यास कोणत्या कायद्याने केली आहेत याचा तपास करणे गरजेचे आहे.

माझा जबाब चालू असतानां व पोलीसांनी सदरचे काम बंद ठेवण्याचे सांगितले असतानासुध्दा त्यांनी नुरबाग या ठिकाणी नवीन काम चालू केले. सदर ठिकाणी डोंगरी पोलीस ठाणेचे कर्मचारी यांनी बंद केले.

वरील सर्व गोष्टींचे बिएमसी रोड डिपार्टमेंट, सेंट्रल एजन्सी व ज्यांच्या संमतीने हे बेकायदेशिर काम जाणूनबुजून करण्यात आले त्या व्यक्तींवर कलम १६६, १६७, २१७, २१८,

२६८, ४३१, ४०९, ४२० भादंवि व इतर योग्य त्या कलमाखाली त्यांच्यावर गुन्हे नोंद करावेत, ही विनंती.

माझ्या वरीलप्रमाणे दिलेल्या माहितीच्या आधारे लोकसेवकाविरुध्द दखलपात्र स्वरुपाचा गुन्हा होत आहे. तसेच कलम ४०९ भादंवि याची शिक्षा ७ वर्षापेक्षा जास्त असल्याने माझ्या तक्रारीमध्ये चौकशी करण्याची कायद्यात तरतूद नाही. तरतूद फक्त गुन्हा दाखल करण्याची आहे.

पोलीसांनी जर या प्रकरणात दखलपात्र गुन्हा निष्पन्न होवून सुध्दा गुन्हा नोंद केला नाही, तर आपण कलम १५४ फौदंप्रसंहिता, ललिताकुमारी जजमेंट, गर्व्हमेंट ऑफ इंडीया, परिपत्रक १०/०५/२०१३ व ०५/०२/२०१४ आणि डीजीपी महाराष्ट्र यांचे परिपत्रक १७/०२/२०१२, तसेच अमित बोरकर हायकोर्ट जस्टीस, हरिष अरोरा विरुध्द रजिस्टर ऑफ सोसायटी आणि सिताराम शलिंगाप्पा म्हेत्रे विरुध्द स्टेट ऑफ महाराष्ट्र यांच्या बाईडींग प्रेसिडेंट याचा उल्लंघन स्पष्टपणे होत आहे.

मी सादर केलेल्या अर्जामध्ये एकूण १२ हायकोर्ट, सुप्रिमकोर्टच्या आदेशाची माहिती दिलेली आहे. जे पोलीसांवर बंधनकारक आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलिखीत केला आहे. तो मला वाचून हिंदीत समजावून सांगितलां तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

१९/१/२६

**(श्रीकांत शिंदे)**,
पोलीस निरीक्षक,
डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई.

K.R.